## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही
## कृषि हवामान सल्ला पत्रक
## गोंदिया जिल्हा

क्र.कृ.ह.स./२६/कृ.सं.के./०१/२०२५ — दिनांक ०१ एप्रिल २०२५

| हवामान घटक | पुढील पाच दिवसाचा हवामान अंदाज दिनांक ०२ ते ०६ एप्रिल २०२५ | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०२/०४/२०२५ | ०३/०४/२०२५ | ०४/०४/२०२५ | ०५/०४/२०२५ | ०६/०४/२०२५ |
| पाऊस (मिमी) | ०.० | १६.५ | १८.२ | ०.० | ०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३७.६ | ३५.६ | ३६.७ | ३८.८ | ४०.२ |
| किमान तापमान (अं.से.) | २६.५ | २५.५ | २५.५ | २५.६ | २६.३ |
| सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ८३ | ८० | ८० | ६६ | ५५ |
| दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ५२ | ५५ | ५८ | ३८ | ३० |
| वा-याचा वेग (किमी/तास) | ११ | १८ | ९ | ११ | ७ |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ |

**हवामान अंदाज:** भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार गोंदिया जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसात ०२ ते ०६ एप्रिल २०२५ रोजी आकाश आंशिक ढगाळ ते ढगाळ राहून कमाल तापमान ३५.६ ते ४०.२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २५.५ ते २६.५ अंश सेल्सिअस राहून दिनांक ०३ ते ०४ एप्रिल रोजी तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**चेतावणी:** गोंदिया जिल्ह्यात दिनांक ०३ ते ०४ एप्रिल रोजी तुरळक/एक किंवा दोन ठिकाणी विजांचाकडकडाट, मेघगर्जना, वादळ वारा (वेग ४०-५० किमी प्रति तास) व हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे.

| पिकांचे नाव | पिकाची अवस्था | शेतकऱ्यांना हवामान आधारीत कृषी सल्ला |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | ➢ वादळवारा वाहण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी भाजीपाला, फळबागा आणि इतर पिकाला पिक वाढीची अवस्था बघून आधार द्यावा.<br>➢ हलक्या पावसाचा अंदाज लक्षात घेता, कृषी उत्पन्न बाजार समिती मधील खरेदीदार व इतर शेतमाल खरेदीदारांनी शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल उघड्या जागेवर न ठेवता शेड मध्येच साठवावा. |
| | | ➢ विजांचाकडकडाट, मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता असल्याने शेळ्या, मेंढ्या, व इतर जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. |
| | | ➢ शेतात काम करतांना मेघगर्जनेचा आवाज ऐकायला आल्यास पक्क्या इमारती किंवा सुरक्षित ठिकाणी जावे, झाडाखाली आसरा न घेता मोकळ्या मैदानावर झाडाच्या उंचीपासून दुप्पट ते चारपट अंतरावर आसरा घ्यावा. |
| | | ➢ विजांच्या ठिकाणांचे निरीक्षण करण्यासाठी दामिनी - लाईटनिंग अलर्ट (Damini : Lightning Alert) या मोबाईल ॲप चा वापर करावा तसेच विजांपासून बचावासाठी ॲप मध्ये उपलब्ध असलेल्या माहितीचा उपयोग करावा. |
| उन्हाळी मुंग | वाढीची अवस्था | ➢ पेरणीनंतर ३० दिवसांनी २ ते ३ कोडपण्या/खुरपण्या देऊन व निंदण करून शेत स्वच्छ ठेवावे. पीक एक महिन्याचे होईपर्यंत शेतात तण होणार नाही याची काळजी घ्यावी. |
| उन्हाळी तीळ | वाढीची अवस्था | ➢ ढगाळ हवामान व वाढत्या आद्रतेमुळे तीळ पिकावर अनुजीवी बुरशीजन्य करपा आढळण्याची शक्यता आहे तरी त्याच्या नियंत्रणासाठी ताम्रयुक्त औषध २० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन ६ ग्रॅम प्रति प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| उन्हाळी भुईमूंग | फुल ते शेंगा अवस्था | ➢ उन्हाळी भुईमूग पिकावरील पाने पोखरणारी अथवा पाने गुंडाळणारी अळीच्या व्यवस्थापनासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली किंवा कार्बारील ५० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी ४० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ उन्हाळी भुईमूग पिकावरील तांबेरा व टिक्का या रोगाचे व्यवस्थापन करण्यास टेबुकोनोझोल २५ टक्के डब्लू.जी ५००-७५० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| उन्हाळी धान | फुटवे अवस्था | ➢ उन्हाळी धान पिकाच्या रोवणीस ३० दिवसानंतर उरलेल्या ५० टक्के नत्राच्या मात्रेपैकी अर्धी मात्रा २५ टक्के (५४ किलो) युरिया प्रति हेक्टरी द्यावे.<br>➢ पिकाची फुटवे फुटण्याच्या अवस्थेत ३ ते ५ सेंमी पाण्याची पातळी ठेवावी. |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ धानावरील खोडकीडीच्या व्यवस्थापनासाठी ट्रायकोग्रामा जापोनिकम हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे.सोडण्यापूर्वी व सोडल्यानंतर ३-४ दिवस रासायनीक कीटकनाशक फवारू नये.<br>➢ धान बांधीत ५% किडग्रथत फुटवे दिसताच त्यांचा नियंत्रणासाठी क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ टक्के दानेदार किंवा फिप्रोनिल ०.३ टक्के दानेदार @ २५ किलो ग्रॅम प्रती हेक्टरी बांधीमध्ये ५ ते ७ सेमी. पाणी असतांना वापरावे. बांधीमधील पाणी ४ ते ५ दिवस बांधीबाहेर काढू नये. |
| मिरची | फुल ते फळ अवस्था | ➢ ढगाळ हवामानामुळे मिरची पिकावरील फुलकिडे आणि पांढरी माशी च्या नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोयट ५ टक्के ४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून द्यावे.<br>➢ मागील आठवड्यातील ढगाळ हवामानामुळे मिरची पिकामध्ये भुरी या रोगाचा प्रादुर्भाव वाढू शकतो म्हणून भुरी रोगाच्या नियत्रणाकरिता मायक्लोब्यूटायूनील १० % ड्ब्ल्यु. युपी १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगी | फळ वाढीची | ➢ शेंडे आणि फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| आंबा | फळ वाढीची अवस्था | ➢ आंबा पिकावरील तुडतुडे व भुरी नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एस एल ३ मिली + सल्फर ८० % डब्ल्यू पी २५ ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी<br>➢ फळगळ कमी करण्यासाठी २० पीपीएम नॅफथालिक एसिटिक एसिड (एनएए) १० लिटर पाण्यात मिसळून मोहोरावर फवारणी करावी. |
| पशुपालन सल्ला | | ➢ विजांचाकडकडाट, मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता असल्याने शेळ्या, मेंढ्या, व इतर जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे.<br>➢ तापमानाची वाढ लक्षात घेता जनावरांना उन्हा पासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना गोठ्याची/ सावलीची व्यवस्था करावी व स्वच्छ पाणी पाजावे.<br>➢ जनावरांसाठी हिरव्या चाऱ्यासाठी मका पिकाच्या आफ्रिकन टॉल आणि ज्वारी पिकाच्या पुसा चारी, एसएसजी ८९८ या वाणाची लागवड करावी. |
| कुकुटपालन सल्ला | | ➢ तापमान वाढण्याची शक्यता असून कुकुटपालन गृहात पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याच्या भांड्याची संख्या वाढवावी. स्वच्छ व मुबलक प्रमाणात पाण्याची व्यवस्था करावी तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळीच्या वेळेस दयावे. |
| माती परिक्षण | | ➢ शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये पिक लागवड करण्यापूर्वी माती परिक्षण अवश्य करावे. माती परिक्षणाच्या अहवालावरून आपल्या मातीमधील अन्नद्रव्यांची कमतरता कळते जेणेकरून रासायनिक खतांचे नियोजन करता येते व खतांची बचत होते ज्यामुळे जमिनीची सुपिकता राखली जाते. |

➢ हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी.

शेतकरी बंधुनो सप्रेम नमस्कार, वर्ष २०२५ मधील ग्रामीण कृषि मौसम सेवा सल्ला पत्रक नोंदणीसाठी आपले नाव, गाव,पत्ता, मोबाईल नंबर इत्यादी माहिती ई-मेल aassindewahi@gmail.com किवा मोबाईल नंबर ९६२३३६०३२७ वर संपर्क साधावा.

प्रकल्प समन्वयक
ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र,
सिंदेवाही जि. चंद्रपूर